माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ४०३/२०२३**

**तक्रारकर्ता, श्री. कुमार भास्कर काळबांडे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी, तथा कार्यालयीन अधिक्षक,**
**उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा वनविभाग, वर्धा, ता.जि. वर्धा**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक वरसंरक्षक**
**(तेंदु व वन्यजीव, ) वर्धा वनविभाग, वर्धा, ता.जि. वर्धा**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १४.०२.२०२४**

**तक्रारकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| २८.०८.२०२३ | --- | २५.१०.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २०१४/२०२३ मध्ये दिनांक २८.०८.२०२३ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १४.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा श्री. एस. एम. गोरे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, वर्धा श्री. अमरजित पवार उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २०१४/२०२३ मध्ये दिनांक २८.०८.२०२३ रोजी सुनावणी घेवून " १. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली व अपिलार्थी यांनी दिनांक १४.०२.२०२३ रोजीचा अर्ज अर्जात दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कलम २ (च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती याआधीच एकूण २९ पृष्ठांची माहिती पुरविण्यात आली असून व त्या

व्यतिरिक्त अपिलार्थी यांच्या कथीत अनुभव प्रमाणपत्राची माहिती उपलब्ध असल्यास ती विनामुल्य प्रदान करावी व अशा स्वरुपाची माहिती उपलब्ध नसल्यास अपिलार्थीस माहिती निरंक असे उत्तर सुचित करीत पुन:श्च एकदा मुद्दा क्र. १ ते ३ या संदर्भातील २९ पृष्ठांची माहिती या व्यतिरिक्त कुठलिही माहिती उपलब्ध नसल्याच्या पत्रासह व शासनाने सादर केलेल्या अहवाल प्रतीसह अपिलार्थीस प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपिल निकाली काढण्यात आले आहे,"

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २५.१०.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जात, द्वितीय अपील क्र. २०१४/२०२३ मध्ये दिनांक २८.०८.२०२३ रोजी पारित आदेशाच्या विसगंत माहिती पुरविली असल्याचा आक्षेप नोंदविला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास ठामपणे सांगितले की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना २९ पृष्ठांची माहिती याआधीच दोन वेळा प्रदान केली. श्री. काळबांडे यांच्या विषयी एप्रिल २००२ ते डिसेंबर २००४ या कालावधीतील जावक रजिस्टरची पडताळणी केली असता, सदर व्यक्तीला या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे काम केल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे दिसून आले नाही, असे वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगणा यांनी दि. १७.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये याआधीच माहिती प्रदान केली. आयोगाने पारित केलेल्या व्दितीय अपिल आदेशानुसार तंतोतत पालन केले आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ मध्ये १ जून २००४ ते ३० जुलै २००४ इतक्या दोन महिन्याच्या जावक रजिस्टरची सत्यप्रतीची मागणी केली असून वरील पृष्ठ त्यांना प्रदान केल्यास त्यांच्याविरुध्द सुरु असलेल्या न्यायालयीन, अर्धन्यायालयीन, कार्यालयीन प्रकरणात निर्णय घेण्यास मदत होईल. द्वितीय अपील क्र. २०१४/२०२३ मध्ये दि. २८.०८.२०२३ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार या प्रकरणात माहिती निरंक असल्यास तसे कळवावे व जावक रजिस्टर उपलब्ध असल्यास १ जून २००४ ते ३० जुलै २००४ पर्यंतच्या पृष्ठांची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत पुरविण्यात येत असलेली माहिती या शिक्क्यासह व माहिती अधिकार अधिनियमाच्या लोगोसह अपिलार्थी यांना तात्काळ व विनामुल्य प्रदान करावी, या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १४.०२.२०२४

माहिती आयोग खंडपीठ नागपूर ... *नागपूर*

जा.क्र.--1228--दि.------------
4 MAR 2024



E:\SS/ तक्रार १४.०२.२०२४\४०३-२०२३ श्री. काळबांधेdocx